Regd. No. MH/BYE/26

श्रीसाईबाबा ट्युटोरिअल अॅकॅडमीज

# इंटर आर्टस् क्लासेस् (१९४३)

## स्पेशल इंटर आर्टस्चे एकमेव क्लासेस्)

क्षत्रिय निवास, गिरगाव पोर्तुगीज चर्च, लाखाणी बुक डेपोसमोर

वैशिष्ट्ये

(१) ३३ वर्षांचा इंटर आर्टस् परिक्षेचा खास अनुभव व वैयक्तिक लक्ष.

(२) सर्व विषय संपूर्ण सायक्लोस्टाईल्ड नोटस्सहित शिकविले जातात.

(३) युनिव्हर्सिटी परिक्षेकरिता अपेक्षित प्रश्न (सायक्लोस्टाईल्ड उत्तरासहीत दिले जातात.)

(४) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री **नामदार श्री. शंकरराव चव्हाण, कै. नामदार श्री. भाऊसाहेब हिरे व सुप्रीम कोर्टाचे जस्टीज श्री. वाय. व्ही. चंद्रचूड, मुंबईच्या स्मॉलकॉजेस कोर्टाचे चीफ जस्टीज श्री. नारायणदास शहा, प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट श्री. आठल्ये व भवन्स हजारीमल सोमाणी कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. शशिकांत पारेख, अंबिका सिल्क मिल्सचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सुरेंद्र मेहता, कामानी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. नवीन कामानी इत्यादींच्या मुलांमुलींनी भूषविलेले.**

(५) प्रत्येक वर्षी २०-२५ विद्यार्थी लॉजिक व इकॉनॉमिक्समध्ये फर्स्ट क्लास मार्क्स मिळवितात. **गेल्या वर्षी आमची विद्यार्थिनी कुमारी गोरांडे पारेख मुंबई विश्वविद्यालयाच्या इंटर आर्टस् परिक्षेत पहिली आली व तिने रु. १२००ची लोटस स्कॉलरशिप व रु. १२०० ची गंगाबाई भट ह्या दोन स्कॉलरशिप्स मिळविल्या.**

**ऑक्टोबर / मार्च बॅचेस** — सकाळ, दुपार, संध्याकाळ.

गुरुवार ता. १ जुलै १९७६ पासून क्लासेस सुरू.

अॅडमिशन्स जोरात सुरू आहेत ● त्वरा करा ● मर्यादित जागा.

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.

४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक**, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड

खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४

# श्री साईलीला



दहीहंडीचा खेळ





ऑगस्ट

६० पैसे

# अनुक्रमणिका– ऑगस्ट १९७६


१) संपादकीय – आत्मसाक्षात्काराचा सोपा मार्ग-भक्ती
२) माणिकनगरचे सिद्धराज माणिकप्रभु महाराज – सदानंद चेंदवणकर
३) साईबाबांविषयी सामान्यज्ञान किती आहे – श्री. माधव गोरे
४) युगावतार श्रीसाई – ४ – श्री. चंद्रकांत सामंत
५) साई थोर तुझे उपकार – सौ. प्रतिभा नागवेकर
६) महाभारत आपल्या शरीरात आहे. – डॉ. अनिल जायस्वाल
७) भक्त बोढाणा – डॉ. के. भ. गव्हाणकर
८) प्रवास – श्री. गं रा. भट
९) स्वप्नी श्रीसाई दर्शन – श्री. सुभाष अंकुश सावंत
१०) फोटो ! फोटो ! बाबांचा फोटो – श्री. अनिल पंडित
११) मला साई भेटले – श्री. वसंत महादेव फरतोडे
१२) श्रीसंत गुलाबबाबांच्या लीला – श्री. राम गोविंद मुरकुटे
१३) वाऱ्यावरचे विचार – श्री. द. शं. टिपणीस
१४) वाचकांचा पत्रव्यवहार – श्री. व सौ. आर. जी. डुबल
१५) ग्रंथभेटींचा स्वीकार – श्रीसाईनंद
१६) श्रीसाईधामचा रौप्यमहोत्सव –
१७) पिळगाव श्रीसाईमंदिरातील गुरुपौर्णिमा –
१८) श्रीसंतगुलाबबाबांची मुंबापुरीस भेट –
१९) "श्रीपाद" मध्ये गुरुपौर्णिमा – श्री. रा. ना. हर्डीकर
२०) कल्पक शिल्पकार श्री. जनार्दन कुळकर्णी – श्रीसाईनंद
२१) शिर्डीवृत्त माहे जून-७६ – –
२२) नमस्कार श्रीसाईचरणास – श्री. मधुकर आखरे
२३) तुझ्यावरी भरी भार – श्री. मधुभाई चेंदवणकर
२४) श्रीसाईनाथ माझा हरी – कमल गोरे
२५) साई माऊली – कु. सुषमा नाचणे
२६) श्रीसाईच्या समाधीसमोर – प्रा. गुंडेराव पटवारी
२७) विनती – श्री. शांताराम पवार
२८) कमुबाबांच्या प्रेरणेने शिर्डी दर्शन – सौ. शांता सरोदे
२९) श्रीसाई कृपावंत – श्री. दा. ना. देशमुख

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री सा ई वा क्सु धा

समः सर्वेषु भूतेषू ।
जोंवरी अप्रास हा स्थितिविशेषु ।
तोंवरी न भूतात्मा हृषीकेशु ।
ज्ञान प्रकाशूं समर्थ ॥११४॥
विहितकर्में चित्त शुद्ध ।
होतां होईल अभेद बोध ।
शोकमोहादि संसृतीविरुद्ध ।
प्रकटेल सिद्ध ज्ञान तें ॥११५॥
अखिल त्रैलोक्य सचराचर ।
आच्छादी जो ईश परमेश्वर ।
निष्क्रिय निष्कल जो परात्पर ।
तो अशरीर सदात्मक ॥११६॥
नामरुपात्मक हें विश्व ।
सबाह्य आच्छादी हा ईश ।
तो मीच मी भरलों अशेष ।
निर्विशेषरुपत्वें ॥११७॥
अस्तु वस्तुतः जें निराकार ।
मायागुणें भासे साकार ।
कामुकापाठीं हा संसार ।
तोचि असार निष्कामा ॥११८॥

—श्रीसाईसच्चरित् अध्याय २० वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५५ वे] ऑगस्ट ७६ [अंक ५



: संपादक :

श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )



वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.



: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४—बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# संपादकीय —

स. न. वि. वि.

## आत्मसाक्षात्काराचा सोपा मार्ग – भक्ती

अज्ञानाने, मायेने 'मी देह आहे' हा भ्रम निर्माण होतो. या भ्रमातूनच वासनांचा जन्म होतो. वासनांमुळे मनुष्य विषय प्राप्तीसाठी सकाम कर्माचा विचार करतो व त्यातूनच सुखदुःख निर्माण होते. विषयध्यानातून आसक्ती, प्रबळ वासना, क्रोध, संमोह किंवा भ्रमस्मृती, बुद्धिनाश, सर्वनाश या क्रमाक्रमाने मनुष्य सर्वनाशाप्रत जातो. सुखदुःखाच्या भोवऱ्यात फिरत रहातो. विषयध्यानाने आसक्ती वाढते. ती वाढल्यामुळे प्रबळ वासना वाढतात व त्यामुळे हित, अहित, चांगले वाईट यांचे विस्मरण होते व बुद्धीचा नाश होतो.

माणसाच्या आत्म्याचे ज्ञान न होण्याचे कारण विषय वासना आहे. इंद्रिये विषय सेवन करतात तेव्हा सुखदुःखाची द्वंद्वे भोगावी लागतात. त्यात मनुष्य गोवला गेला की त्याचे आत्म्याकडे लक्षच जात नाही. वासना हे अज्ञानाचे मूळ आहे. 'मी देह आहे' या भ्रमामुळे वासना व विषयासक्ती वाढते, देहाला सुख हवे ह्या वासना देहतादात्म्य भावना दृढ करतात. वासना, तृष्णा म्हणजे रजोगुण. वासना तृप्तीसाठी मनुष्य धडपड करीत रहातो. त्यामुळेच मनुष्य तमोगुणाच्या बंधनात पडतो. तमोगुणाचे परिणाम म्हणजे निद्रा, आळस व अविवेकी आचरण. तमोगुणात देहतादात्म्य परकोटीला पोचते. जड देह म्हणजे मी एवढेच ज्ञान तमोगुणी पुरुषाला असते. देहाची क्षणिक प्रेरणा हेच त्याचे जीवन. तात्कालिक सुख त्याला आकर्षित करते.

माया म्हणजे देहतादात्म्य व वासना. ईश्वराला शरण गेल्यावाचून त्याचे चिंतन केल्यावाचून ही माया नष्ट होणे अशक्य. वासनांमुळे विवेकाचा अस्त होतो. मनुष्य जीवन साफल्याला मुकण्याचे कारण म्हणजे देहाहंकार व वासना होय. मरण देहाला आहे, आत्म्याला नाही. देह गेला तरी आत्मा दुसरा देह घेऊन येतोच. जन्म, मृत्यु, पुनर्जन्म हे सर्व आत्म्याने जुनी वस्त्रे टाकून नवीन वस्त्रे स्वीकारण्यासारखे आहे. जन्मलेल्याला मृत्यु व मृताला पुन्हा जन्म या अपरिहार्य गोष्टी आहेत. देहाला मृत्यु आहे. आत्मा अमर अविनाशी आहे. ज्ञानी पुरुष सुखदुःखाचा विचार करीत नाहीत. देहाहंकाराने वासना सक्त होऊन सुखदुःखाच्या चक्रात अडकून न पडता आत्महित साधण्याचा प्रयत्न करतात. ज्याला वासना नाहीत त्याला सुखदुःख समानच असते. वासना जिंकल्या की देहाहंकार टाकता येतो व आत्मस्वरूपाचे ज्ञान होते. अहंकार व वासना जिंकल्या म्हणजे सुखदुःख समान वाटते.

इंद्रिये, मन, कृति या तीनही ठिकाणी वासना असतात. इंद्रिये विषयाकडे धावू लागली की मनाला आपल्या बरोबर ओढतात. मनामागे बुद्धिही तिकडे खेचली जाते. आत्मप्राप्तीसाठी भक्तिसाधन अवश्य आहे. विषयाच्या ओढीतून मुक्त झालेली मन, बुद्धि ईश्वर चिंतनाकडे लावली पाहिजे. वासना नाशानंतर आत्मानंद लाभतो.

आत्मप्राप्ती व आत्मानंद लाभल्यानंतर पूर्ण नैष्कर्म जोडले जाते. त्याला देहाचे सुख व दुःख त्याच्यापर्यंत पोचतच नाही. ज्ञान म्हणजे साक्षात्कार. साक्षात्काराने देहतादात्म्यक व तन्मूलक वासना नष्ट होतात. ' अहं ब्रह्मास्मि ' हा अनुभव येतो. सर्व काही ब्रह्म आहे हा अनुभव येतो. विषयलालसेने मन सदा विषयाकडे धावत रहाते. ही अशांती आत्मानंद मिळाल्यावर नाहिशी होते. लोप पावते. साक्षात्काराने ' मी देह आहे ' हे अज्ञान नाहीसे होते. मी आत्मा आहे हा अनुभव येतो. मन, बुद्धि, निष्ठा सर्व ईश्वर ठायी ठेवून स्वतःला सर्वस्वी त्याला वाहून अनन्य भक्ति केली म्हणजे असा साक्षात्कार होतो. साक्षात्काराने सर्व पाप देहाचा अहंकार, वासना नष्ट होतात. आत्मसाक्षात्कार व आत्मानंद एकच आहे.

आत्मसाक्षात्कार ईश्वराचे कृपेने होऊ शकतो. साधनाची परिणती ईश्वराची कृपा लाभण्यात झाली पाहिजे.

साधकात अनन्य भक्ति, शरणागती निर्माण झाली म्हणजे ईश्वर कृपा करतो आणि त्याच्या कृपेने पूर्ण साक्षात्कार होतो. अनन्य भक्तिच साक्षात्काराचे एकमेव साधन आहे.

आत्मसाक्षात्काराने आत्मस्वरूप झालेल्या भक्तांना ' सर्व खलु इदं ब्रह्म ' हे ज्ञान होते. आत्म्याला स्वतःला दृष्टा व दृष्य या दोन्ही भागात विभागण्याचे सामर्थ्य आहे. विश्वाचा व जीवाचा ब्रम्हाशी अभेद आहे हे ज्ञान होते व त्याचा त्याला अनुभव येतो हीच सत्य अनुभूती होय व हीच अनुभूती मानवाला जीवनमूल्याची प्राप्ती, कृतार्थता व सफलता प्राप्त करून देते. ●

प्रतीदत्त श्री पंत महाराज बाळेकुंद्रीकर
यांच्या स्मृती दिनानिमित्य खास लेख
श्रीसाईलीला सप्टेंबरच्या अंकात अवश्य वाचा
• गाठीभेटी या सदरात पुण्याचे निस्सीम वयोवृद्ध साईभक्त
श्री नानासाहेब रासने

गाठीभेटी—२१

# माणिकनगरचे • सिद्धराज

# • माणिकप्रभु • महाराज •

• सदानंद चेंदवणकर

राधा-माधव, १२०/४०५५ टिळकनगर,
चेंबूर, मुंबई ८९.



सिद्धराज माणिकप्रभु महाराज

जुन्या निजाम सरकारच्या राज्यात गुलबर्गा, कल्याण आणि बेदर या तीन शहरांच्या त्रिकोणात असलेल्या भूभागाला दरी किंवा दरी पट्टी असे म्हणत असत. या प्रदेशाची लांबी अंदाजे १२० कि. मि. व रुंदी ३५ कि. मि. आहे. फार फार पूर्वी या प्रदेशास 'मणिचूल पर्वत' असे नाव होते. श्रीगुरुचरित्रात त्याचा 'मणिगिर' या नावाने उल्लेख आहे. 'वृषभाद्रि' असेही त्यास म्हणतात. कारण बैलाच्या आकाराचा तो प्रदेश आहे. लिंगायत धर्माचे संस्थापक गुरु बसवेश्वर हे याच प्रदेशात होऊन गेले. चालुक्य, कलचुरी इ. वंशानी आपापली राज्ये येथेच प्रथम स्थापन करून मग त्यांचा विकास विस्तार केला. राजाराम महाराजांनी धनाजी जाधव या आपल्या मुत्सद्दी सेवकाला 'जयसिंगराव' असा सन्माननीय किताब दिला व त्याचे स्मारक म्हणून 'जयसिंगपेठ' या नावाचे शहर वसविले. त्याचा मुलगा रामचंद्र याने आपले राजधानीचे ठिकाण केले. आज या शहराला 'हुमणाबाद' असे म्हणतात. सदानंद, पूर्णानंद, शिवराम स्वामी असे कितीतरी संत या भागात होऊन गेले. अशा या पावन पवित्र भूमीत व निसर्गसौंदर्याने नटलेल्या विभागात सद्गुरु श्री माणिक प्रभूंचा जन्म मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थी शके १७३९ मध्ये लाडवंती या गावी झाला. ते दत्ताचा अवतार होते अशी सर्वत्र दृढ श्रद्धा आहे. लहानपणापासून तो समाधी कालापर्यंत त्यांनी असंख्य चमत्कार करून जनजागृतीपण केली. आपल्या भक्तांचे मनोरथही त्यांनी पुरविले. पुढे कालांतराने प्रभु माणिकजी हुमणाबाद जवळच्या एका ओढ्याच्या काठी जाऊन बसले तेव्हा त्यांचे असंख्य भक्त त्यांच्या दर्शनास तिथे जाऊ लागले. तो ओसाड व निर्जन प्रदेश भक्तांच्या जाण्यायेण्याने सुव्यवस्थित झाला व या नव्या स्थळास माणिकनगर असे नाव पडले. माणिकनगराची स्थापना झाल्यावर रामनवमी, गोकुळअष्टमी, गणेशचतुर्थी, दत्तजयंती इ. उत्सव तिथे अतीव उत्साहाने साजरे करण्यात येऊ लागले व आजही हे उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. श्री माणिक प्रभू महाराज मार्गशीर्ष शुद्ध दशमी शके १७८७ मधे दत्तचरणी विलीन झाले. त्यांचेनंतर श्रीमनोहर माणिक प्रभू श्री मार्तंड माणिक प्रभू. श्री शंकर माणिक प्रभू यांची माणिकनगरची गादी सुशोभित केली. सध्या या गादीवर श्रीसिद्धमहाराज माणिक प्रभू महाराज विराजमान आहेत.

श्री. सिद्धराज माणिक प्रभू महाराज हे श्रीशंकर माणिक प्रभूंचे पुत्र होत. त्यांचा जन्म १ फेब्रुवारी १९३९ रोजी श्रीमाणिक नगरात झाला. सिद्धराज जसजसे मोठे होऊ लागले तसतसे त्यांच्या अंगचे अद्भुत सामर्थ्य प्रगट होऊ लागले. वयाच्या चौथ्या पाचव्या वर्षाची गोष्ट. बाहेर खेळता खेळता ते अचानक आपल्या वडिलांजवळ येऊन म्हणाले, "ताता, ताता, देसायांची मोटार मोडली." नांदेड जिल्ह्यातील सगरोळी गावचे देशमुख श्री. गोविंदराव देसाई माणिकनगरास येण्यास निघाले खरे पण वाटेत

त्यांची मोटार नादुरुस्त झाली. ती दुरुस्त होईतोपर्यंत त्यांना त्या जागी दिवसभर खोळंबून रहावे लागले. दुसऱ्या दिवशी माणिकनगरास आल्यावर त्यांनी श्रीशंकर प्रभूंना घडलेला प्रकार सांगितला. "तुमची मोटार केव्हा बिघडली ?" असा श्रींनी प्रश्न केला तेव्हा छोट्या सिद्धराजांनी सांगितलेली वेळ व त्यांनी सांगितलेली वेळ एकच होती असे आढळून आले. अशा प्रकारे छोट्या सिद्धराजाच्या बाललीलांची व त्यांच्या त्रिकालदर्शित्वाची साक्ष सर्वांना पटू लागली. श्रीमार्तंड प्रभूंनी "मी लौकरच पुन्हा येतो" असे आश्वासन दिले होते. त्यानुसार श्री सिद्धराजांच्या जन्माने ते जणू पुन्हा प्रगटले आहेत असेच आता समजले जाते. सिद्धराजाना लहानपणी 'राजा' या नावाने संबोधले जात होते; तर त्यांच्या मातोश्रींना 'मामी' या नावाने सारेजण ओळखत. त्यांचे खरे नाव लक्ष्मीबाई. राजांचे संपूर्ण शिक्षण ग्वाल्हेरच्या सिंधिया फोर्ट स्कूलमध्ये झाले आहे. शालेय विद्या संपादन करून वयाचे १६ वे वर्षी म्हणजे ता. ५ एप्रिल १९५५ रोजी ते ग्वाल्हेरीहून परतले. इ. स. १९५६ च्या मार्गशीर्षात एका शुभमुहूर्तावर एक भव्य समारंभ माणिकनगरात साजरा झाला व त्यावेळी दरबारी थाटात श्रीप्रभूंच्या सिंहासनावर श्रीराजा उर्फ श्री सिद्धराज प्रभूंना सन्मानाने बसविण्यात आले. हजारो भक्त त्यावेळी हजर होते. श्रीसद्गुरू माणिक प्रभु महाराजांच्या सकलमत धर्मपीठाचे पंचमाधिकारी म्हणून श्रीसिद्धमहाराजांना ओळखले जाते व प्रभूंच्या सकलमत पीठाची धुरा वाहाण्याकरिताच आपला अवतार आहे असे ते समजतात. त्यांचे व्यक्तिमत्व मोठे प्रसन्न आहे. त्यांच्या मुखातून कधीही 'अरे' असा सत्तावाचक शब्द निघालेला नाही. सुष्ट असो किंवा दुष्ट असो सर्वांशी ते प्रसन्न अंतःकरणाने वागतात. ते कुणाचेही मन दुखवित नाहीत. कठोर भाष्य कुणाशीही करीत नाहीत.

श्री सिद्धराजांनी आपल्या पूर्वपरंपरेनुसार चालत आलेल्या संस्थानच्या गादीचा कारभार सुरळीतपणे चालविलेला आहे. ग्वाल्हेरच्या सिंधिया विद्यालयातून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा व गुणाचा उपयोग करून त्यांनी आपल्या माणिकनगर संस्थानमध्ये अनेक सुधारणा करून संस्थान उर्जितावस्थेला आणखीन आणले आहे. संस्थानात त्यांनी एका हिंदी महाविद्यालयाची स्थापना केली असून, आज त्यास सरकारी मान्यतापण मिळाली आहे. विद्यालयास जोडूनच विद्यार्थ्यांसाठी रहाण्या-जेवणाची फुकट व्यवस्था असलेले वसतीगृह पण आहे. या शाळेसाठी विस्तीर्ण पटांगण असून मुलांना क्रिकेट, व्हॉली बॉल, फुटबॉल, कबड्डी इत्यादी खेळ व मुलींना त्यांचे योग्य असे खेळ खेळण्यास शिकविले जाते.

श्री. सिद्धराज याचा विवाह १ जुलै १९५७ रोजी माणिकनगरमध्ये श्री प्रभु मंदिरात मोठ्या थाटाने साजरा झाला. श्री. क्षेत्र हरीहर हे सुप्रसिद्ध रामदास पंथाचे कर्नाटकातील महान पवित्र क्षेत्र आहे. तेथील मठाधिपती प. पू. श्री नारायण महाराज यांची कन्या मुक्ताबाई ही श्रींची सुपत्नी होय. त्यांचे आजचे नाव सौ. मीराबाई.

श्री प्रभूंना त्यांचे पासून ज्ञानराज हा पुत्र व मंदाकिनी व सुमंगला या कन्या एवढी अपत्यसंपदा आहे.

श्रीसिद्धराज प्रभूजी आपल्या संस्थानची देखभाल तन मन धनाने करीत आहेत. त्यांच्या उदात्त विचारसरणीने व आचरणाने आबालवृद्धांच्या अंतःकरणात श्रींच्याबद्दल आदरभाव निर्माण होतो व कुणाचेही मन त्यांचेकडे आकृष्ट होते. त्यांच्या संभाषणाने थोर मोठ्या, सरकारी, मंत्री, राज्यपाल अशा व्यक्ती प्रभावित झालेल्या आहेत. व त्यांनी त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. त्यांच्या पद्यरचनेत श्री मार्तंड प्रभुप्रमाणे वेदांताची पकड तर आहेच, पण शिवाय उत्कट भक्तीचा जिव्हाळा पदोपदी प्रत्यय येतो. प्रतिकूल परिस्थितीत प्रसंगाचे गांभीर्य ओळखून धीरोदात्त विचाराने मन सुदृढ व खंबीर राखण्याची प्रबळ इच्छाशक्ति त्यांच्यात आहे. ज्यांना खरे सुख हवे असेल तर त्यांची तृष्णा श्रीसिद्धराज प्रभूंच्या केवळ दर्शनाने तृप्त होते यात प्रत्यवाय नाही. आपल्या धार्मिक क्षेत्रास पोषक असलेले वैदिक मंत्राचे अध्ययन, श्रवण त्यांनी मननपूर्वक स्वबुद्धी बळाने अल्पावधीतच सांगोपांग आत्मसात करून घेतलेले आहे. त्याचप्रमाणे तत्वज्ञान, संगीत, कवित्वादी अन्य विषयांचे ज्ञानातील नैपुण्य बघून अल्पवयात हे त्यांनी कसे काय साध्य केले याचे सर्वांनाच मोठे आश्चर्य वाटते. यालाच ईश्वरी देणगी म्हटल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही.

श्री सिद्धराज माणिकप्रभूजींनी भारतभर प्रवास केला आहे. आपल्या एका मुंबापुरीतील मुक्कामात श्रीजींनी अनेक व्याधिपिडीतांना दुःख मुक्त करून त्यांना अनुग्रह दिला. सी. आय. डी. कचेरीत नोकरीस असलेले श्री. द. ना. हिरडे यांना तोंडातला कर्क रोग झाला होता. बरेच उपाय केले पण गुण नव्हता. श्रींचा लौकिक ऐकून ते दर्शनास आले व प्रसाद घेऊन आश्वासन दिल्याप्रमाणे ते खरोखरीच रोगमुक्त झाले. त्याचप्रमाणे लालबागचे डॉ. मुजुमदार यांच्या प्रौढ मुलीचा हात जन्मतःच वाकडा होता. पण श्रींच्या प्रसादाने तो आज व्यवस्थित झाला आहे. आपल्या सकलमत संप्रदायाच्या प्रसार प्रचारार्थ श्रीजी लौकरच परदेशात जात आहेत. श्रींची कीर्ती दिगंत होवो हीच श्रीदत्तचरणी प्रार्थना !

## —: प्रतिभा :—

प्रतिभा ही एक विलक्षण असामान्य आणि अतींद्रिय व अती सूक्ष्म ज्ञानदृष्टी आहे. प्रतिभेमध्ये बुद्धि असते, भावना असते, कल्पना असते, व संकल्प असतो. पण हे सगळे असूनही त्याच्यापेक्षा अधिक काहीतरी असते. प्रतिभा ज्ञानमय असते. प्रतिभेलाच शुद्धबुद्धि म्हणतात. ही स्वयंप्रकाश ज्ञानशक्ति कोणामध्ये केव्हा व कशी प्रकट होईल याला दृश्य नियम सांगता येत नाही.

**—बाळकृष्ण सदाशिव धामणकर,** डोंबिवली.

# तुमचे श्री साईबाबांविषयी सामान्यज्ञान किती आहे?

[ पुढीलपैकी सहा प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्यज्ञान बरे, आठ बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास उत्कृष्ट समजावे. ]

१) श्रीसाईबाबा साधूच्या वेषात दोन लहान मुलांना बरोबर घेऊन...... येथे देव मामलेदार साहेबांच्याकडे जाऊन भोजन करून आले.

अ) अकोला, ब) बडोदा, क) कराची, ड) डहाणू.

२) .........यांनी बाबांना देण्यासाठी पुंडलिक नावाच्या एका भक्ताजवळ एक नारळ दिला होता, पण तो बाबांना मिळालाच नाही.

अ) वासुदेवानंद सरस्वती, ब) सोमदेवजी, क) दासगणू महाराज,

ड) उपासनी बाबा.

३) कफक्षय झालेला भिमाजी पाटील.........चा रहिवासी होता.

अ) संगमनेर, ब) तळेगाव, क) जुन्नर, ड) पुणे.

४) "वाहवा! वाहवा! नवरदेव की सजलासि आता" असे बाबा....... यांना म्हणाले.

अ) चांदोरकर, ब) साठे, क) नूलकर, ड) दासगणू.

५) दासगणूंची इशावास्योपनिषदाची शंका पार्ल्याच्या.........केली.

अ) मोलकरणीने, ब) पांडू गड्याने, क) खापड्योंनी, ड) एका भक्ताने.

६) ......यांना सबीज द्राक्षे निर्बीज लागली.

अ) घुमाळ, ब) धरमसी जेठाभाई, क) नूलकर, ड) शामराव.

७) ......यांनी मंत्र देण्यासाठी बाबांच्यापाशी धरणे धरले.

अ) राधाबाई देशमुख, ब) गोखले बाई, क) लक्ष्मीबाई, ड) बायजाबाई.

८) बाळा शिंप्याचा हिवताप काळ्या कुत्र्याला......घालून बरा झाला.

अ) दूधभात, ब) भाजीपोळी, क) इडली सांबार, ड) दही भात.

९) रामदासांच्या पोथीतून नेमकी......पोथी काढून बाबांनी शामाला ती बक्षिस दिली.

अ) गीता, ब) रामरक्षा, क) विष्णूसहस्र नामावली, ड) हरिपाठाचे अभंग.

१०) भोजनाचे वेळी बाबांच्या डाव्या बाजूला नेहमी......बसत असत.

अ) बडे बाबा, ब) बंब्या काका, क) शामा, ड) म्हाळसापती.

**–माधव गोरे,** विनायक बाग, कुर्ला, ७०

### उत्तरे

१)–ड, २)–अ, ३)–क, ४)–ड, ५)–अ, ६)–ब, ७)–अ, ८)–ड, ९)–क, १०)–अ.

# युगावतार श्री साईबाबा-४

## बाबांच्या लीला

अनुवादक : श्री. चंद्रकांत दामोदर सामंत
डोंगरे मॅन्शन, ताडदेव रोड, मुंबई-७

● श्री साईबाबा सत्संग मंडळ, सुरतचे एक जाणकार सदस्य श्री. बी. एस. लाल हे हातचलाखीचे व जादूचे खेळ करण्याकरता पूर्वी प्रसिद्ध होते. जादूच्या कलेसाठी त्यांनी दीर्घ साधनेनंतर कुलदेवी महाकाली मातेला प्रसन्न करून घेतले होते. ह्या क्षेत्रात त्यांनी परिश्रमाने अलौकिक यश प्राप्त केले होते. कालांतराने श्री साईबाबांची उपासना सुरू केल्यानंतर त्यांनी ह्या सर्व गोष्टींवर पाणी सोडले व सर्वस्व श्रीबाबांच्या सेवेला वाहिले.

श्री. लाल यांना भारती नावाची एक नात आहे. ती चार वर्षांची असताना तिला एकदा कॉलऱ्याप्रमाणे उलट्या व जुलाब सुरू झाले. अनेक डॉक्टर-वैद्यांचे उपाय करुन पाहिले, पण काही उतार पडेना. त्यांचा मुलगा श्री बाबांच्या मंदिरात दर्शनाला आला असता त्याने धुनीमाईतील उदी घेऊन तो घरी परतला. घरातल्या इतर कोणाही मंडळीस खबर न लागू देता त्याने चिमूटभर उदी मुलीच्या तोंडात सोडली, आणि काय आश्चर्य ! तावडतोब उलट्या व जुलाब बंद झाले. नंतर इतरांना ही गोष्ट कळताच सर्वांनाच श्री बाबांच्या लीलेचे कौतुक वाटले.

सुमारे १९६९ सालची ही दुसरी गोष्ट आहे. श्री बाबांची तनमनधन अर्पून सेवा करणारे मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते श्री. ठाकोरभाई पानवाला यांची एकदा श्री साईनाथांनी कसोटीच घेतली. त्याचे असे झाले.

श्री. ठाकोरभाईंचा मुलगा अशोक एकदा त्याच्या मामांच्या घरी गेला होता, तेथेच तो एकाएकी आजारी पडला. सुरवातीला किरकोळ वाटणाऱ्या दुखण्याने काही दिवसातच उग्र रूप धारण केले. अशोकची जीभ पूर्णपणे लुळी पडली. त्याला मुळीच बोलता येईना. तोंड उघडे ठेवण्यासाठी व जीभ दाताखाली चिरडू नये म्हणून त्याच्या तोंडात एक छोटीशी लाकडी पट्टी ठेवीत असत. डॉक्टरांच्या सल्ल्यावरुन सरतेशेवटी अशोकला हॉस्पिटलमध्ये नेले, पण एकंदर परिस्थिती पाहिल्यानंतर डॉक्टरांनाही त्याच्याबद्दल काही आशा वाटेना. श्री. ठाकोरभाई व त्यांचे आप्तेष्ट मोठ्या काळजीत पडले होते. त्यांच्या पत्नीचे डोळ्यातील पाणी जरासुद्धा खळत नव्हते.

गुरुवारचा दिवस उजाडला. रात्रीची आरती नित्याप्रमाणे झाली. श्री. ठाकोरभाईंनी मनोभावे श्रीबाबांची प्रार्थना करून सर्व भार मोठ्या निष्ठेने त्यांच्यावर टाकला. रात्री बाराच्या सुमारास एक अद्‌भुत प्रकार घडला. अशोकची वाचा एकाएकी सुरू झाली, व त्याने पिण्यास पाणी मागितले. नंतर झोपेत असल्याप्रमाणे तो बडबडू

लागला, "माझ्या पलंगाच्या सभोवती हातात सोटा घेऊन पहारा करणारा हा भव्या कोण?" खरे पहाता त्याच्या निकटवर्तियांखेरीज त्या वेळेस त्याच्या पलंगाजवळ कोणीही नव्हते.

तिसऱ्या दिवशी अशोक संपूर्णपणे शुद्धीवर आला. तेव्हाही तो एकच गोष्ट वारंवार बोलून दाखवीत होता, "मी शिरडीस गेलो होतो." त्याच्या तोंडचे हे शब्द ऐकल्यानंतर जमलेल्या मंडळींची तर खात्रीच पटली की मृत्युच्या दाढेतून अशोकला बाहेर काढणारे प्रत्यक्ष श्री साईबाबाच असले पाहिजेत.

श्रद्धायुक्त अंतःकरणाने श्री बाबांची प्रार्थना केल्यास आपल्या भक्तांच्या हाकेला ते निश्चितपणे ओ देतात ह्यात काहीही संशय नाही.

# साई थोर तुझे उपकार

– सौ. प्रतिभा अशोक नागवेकर,
वेस्ट क्वॉर्टर्स ए/५
वडाळा बस डेपोजवळ, मुंबई ३१.

● श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईबाबांच्या अनंतकोटी परमब्रह्मस्वरूपाविषयी लिहिण्यास माझी सामान्य लेखणी कितपत योग्य ठरेल ह्याचा निर्णय मी माझ्या साईप्रेमी बंधुभगिनींवरच सोपविते. श्री बाबांच्याच प्रेरणेने प्रेरित होऊन त्यांच्याकडून मला वेळोवेळी लाभलेल्या कृपाप्रसादाची थोरवी मी निवेदन करीत आहे.

तसे पाहिले तर श्रीसाईभक्तीच्या प्रेमाचे बाळकडू मला लहानपणीच माझे वडील श्री. यशवंत रा. कंटक ह्यांचेकडून मिळाले. माझे वडील पंधरा वर्षांचे असताना श्री क्षेत्र शिरडी येथे गेले होते. त्यावेळी श्री साईबाबांचे शिरडीस प्रत्यक्ष देहस्वरूपात वास्तव्य होते. त्यावेळी आताप्रमाणेच सकाळी काकड आरती वगैरे व्हायची. माझे वडील व माझी आत्या हे दोघे बाबांच्या दर्शनास सकाळीच काकडआरतीस गेले. प्रथमच शिरडीस आल्यामुळे बाबांसाठी फळे किंवा प्रसाद वगैरे नेण्याची रीत त्यांना माहित नव्हती. आरती झाल्यावर बाबांचे दर्शन घेऊन वडील भाड्याने घेतलेल्या जागेत परत आले. तेथे पहातात तो फडताळात चहासाठी घेऊन ठेवलेले दूध कोणीतरी चाटून खाल्ले होते. खोलीच्या दाराला बाहेरून कुलूप असताना कोण बरे दूध पिऊन गेला असावा? असा प्रश्न त्यांना पडला. दुसरे दिवशी माझे वडील नेमके बाबांच्या दर्शनास जाताना दूध घेऊन गेले. तेव्हा माझ्या वडिलांच्या पाठीवर थाप मारून बाबा म्हणाले "अरे बेटा तू इधर तक दूध क्यों लेके आया? मैं तो

तेरे घरमें आके पिता हूँ। बाबांचे हे बोलणे ऐकून माझ्या वडीलांना श्री बाबाच दूध पिऊन गेले ह्याबद्दल मनोमन खात्री पटली. बाबांच्या ठायी गाढ श्रद्धा बसली.

मी साधारण तीन चार वर्षाची होईपर्यंत मला वरचेवर ताप यायचा, थोड-थोडका नव्हे तर अगदी १०६°,१०७° डिग्रीपर्यंत ताप चढायचा. अशावेळी माझे वडील मला बाबांची उदी लावून, "बाबा दया करो, बाबा दया करो" असा सतत धावा करायचे. तेवढ्या तापात जवळजवळ बेशुद्ध अवस्थेत असलेली मी सुद्धा साईबाबा साईबाबा असे बडबडायची. डॉक्टरानी माझी आशा सोडली होती. पण श्रीबाबांनी मला मृत्यूच्या दाढेतूनच वाचवून नवीन जन्म दिला आहे. आजपर्यन्त ज्या काही चांगल्या गोष्टी माझ्या आयुष्यात घडलेल्या आहेत, त्या श्री बाबांच्या प्रेरणेने असे म्हटले तर त्यात अतिशयोक्ती होणार नाही.

दुर्दैवाने वयाच्या तेराव्या वर्षीच मी पितृसुखास वंचित झाले. केवळ किरकोळ आजाराचे निमित्त होऊन माझे वडील गेले. मृत्युपूर्वी ते नेहमी सांगत की " अग ! तुम्ही मला शिरडीस घेऊन चला, तेथे मी राहणार आहे. वास्तविक वडील असताना वर्षातून एकदा तरी आमचे शिरडीस जाणे व्हायचे. वडीलांना जणू आम्हाला सांगायचे होते की, बाबा आता मला आपल्या पायाशी घेऊन जाणार आहेत. परंतु आम्हाला त्यांच्या या बोलण्याचा अर्थ कळला नाही. वडील वारले तो वारही गुरूवारच होता.

वडीलांच्या मृत्यूने मी व आई पूर्णपणे खचूनच गेलो. कारण मी व माझी मोठी बहिण सौ. उषा सोलंकी अशी दोनच भावंडे होतो. माझ्या बहिणीचे लग्न १९५९ मध्ये वडील असताना झाले होते. त्यामुळे आईला व मला घरातील कर्ता म्हणून कोणाचाच आधार नव्हता. पण साईबाबा आपल्या भक्तांच्या मदतीस धावल्यावाचून कसे राहणार ? एखाद्या चमत्काराप्रमाणेच सर्व गोष्टी घडत गेल्या. माझे मेव्हणे श्री. केशर सोलंकी ह्यांनी आमच्या घरी राहण्याचा निर्णय घेतला. मला स्कॉलरशिप मिळून माझे शिक्षणही व्यवस्थित झाले. माझे वडील नेहमी आईला म्हणायचे की, तू काही काळजी करू नकोस. माझे काही बरे वाईट झाले तरी बाबा तुम्हाला कधीही दुसऱ्याच्या दारात जायची पाळी येऊ देणार नाहीत.

पुढे १९७० साली आईचेही निधन झाले. आम्ही दोघी बहिणी मातृप्रेमास पारख्या झालो. आपण जिवंत असतानाच माझे लग्न व्हावे अशी आईची इच्छा होती. पण नशिबापुढे कोण बोलणार ? माझी बहिण व मेव्हणे ह्यानी मला आईची उणीव भासू दिली नाही. दोघांचेही माझ्या लग्नासाठी प्रयत्न चालूच होते. माझी नोकरी कायम नसल्यामुळे सर्वांकडून नकार यायचा. अशावेळी मी निराश व्हायची. श्री बाबांच्या फोटोजवळ उभी राहून रडायची व म्हणायची "हे साईनाथ बाबा, आज-पर्यंत तुम्ही माझी लाज राखलीत, तशीच ह्या बाबतीतही राखा."

आणि एके दिवशी मी ऑफिसमध्ये जाते तीच माझ्याबरोबर काम करणारी माझी मैत्रिण विनिता नाडकर्णी, हिने एक स्थळ सुचविले. माझी बहिण व मेव्हणे ह्यांनी मुलाची चौकशी करून व आम्ही एकमेकास पसंत आहोत हे पाहून १ मे १९७५ हा साखरपुड्याचा दिवस ठरविला व लग्नाची तारीख २९ मे ७५ ठरली. योगायोग म्हणजे दोन्ही दिवस बाबांचे गुरुवार होते. लग्नाचा हॉलदेखील गिरगावात श्री साईधाम शेजारीच मिळाला. थोडक्यात म्हणजे श्री साईकृपेने माझे लग्नकार्य व्यवस्थितरित्या पार पडले. परमेश्वरकृपेने माझे पती श्री. अशोक अतिशय प्रेमळ आहेत. माझ्या सासूबाई श्री. गुलाबबाई नागवेकर ह्याही साईभक्त आहेत. लग्नानंतर आम्ही दोघे शिरडी व साकोरीस जाऊन आलो. आमचा प्रवास आमचे रिझरव्हेशन नसताना देखील आरामात झाला. साकोरीस श्री उपासनी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेण्यास गेलो तेव्हा श्री गोदावरीमातेचेही दर्शन घडले.

अशाप्रकारे आजपर्यंत श्री साईबाबांनी माझी जीवननौका ह्या भवसागरातून यशस्वीपणे पुढे नेली आहे. तसेच ह्यापुढेही मला व माझ्या कुटुंबियांना श्री बाबांचे कृपाछत्र लाभो व अंतिम क्षणापर्यन्त बाबांचा कधीही विसर न पडो हीच माझी ईच्छा. श्रीसाईबाबांबद्दल हा लेख लिहिताना माझे मन साईप्रेमाने भारावून गेले आहे. त्यामुळे पुढील काव्यपंक्ती स्फुरल्या.

**" नेलीस माझी जीवननौका भवसागरातून पार**
**साई थोर तुझे उपकार, साई थोर तुझे उपकार "**

## महाभारत आपल्या शरीरात आहे !

—डॉ. अनिल जायस्वाल,
चितार ओळ नागपूर -२

' महा ' म्हणजे महान व ' भा ' म्हणजे ज्ञान. ' रत ' अर्थात रचना. ज्ञान व भक्तीत रममाण होण्याची कला ज्यात दर्शविल्या गेलेली आहे असा जो ग्रंथ तो महाभारत. '

" रथस्थळीं योजी शरीर ।
दुर्गमरूप रसमार्गीराजी ।
कंठावया मग सारथीं योजी ।
आवरीं मन प्रग्रहमाजीं ।
दशेंद्रियवाजी उच्छृंखळ ॥ " –(अध्याय १७ श्री साईसच्चरित्र)

अर्थात विषयांच्या अनेक मार्गांची परंपरा ही दुर्गम स्वरुपाची असून त्यांच्यावरून हे आपले शरीररुपी रथ नेताना सारथी योजणे अत्यावश्यक आहे. दशेंद्रियरुपी दहा घोडे हे आपल्या रथास योग्य मार्गाने नेण्यास मनरुपी लगामाद्वारे आपण त्यांना आवरले पाहिजे.

परंतु खरे पाहिल्यास या मनावरच आपला ताबा नाही. करिता इंद्रियरुपी घोड्यांचा रथ ईश्वरास सोपविल्यास आपले कल्याण होईल. इंद्रियांचे स्वामी श्रीकृष्ण आपली साईमाऊली आहे.

युधिष्ठिर म्हणजे धर्म. भीम म्हणजे बळ. सहदेव व नकुल अनुक्रमे बुद्धी व ज्ञान आहेत. ह्या चार गुणांनी युक्त– असा हा जीव अर्जुन आहे. हे गुण केव्हा शोभायमान होतात ?

जेव्हा दयारूपी द्रौपदीशी जीवरूपी अर्जुनाचे लग्न जुळते, तेव्हाच हे चार गुण शोभायमान होतात.

धर्मास श्रेष्ठ मानल्यावरच ही दयारुपी द्रौपदी प्राप्त होऊ शकते व हे सर्व घडून आल्यावरच परमेश्वर-श्रीसाईबाबा–आपल्या ह्या इंद्रियरुपी घोड्यांवर नियंत्रण ठेवण्याकरिता सारथीपद पत्करू शकतात.

" को अंधः यो विषयानुरागी "

म्हणजे— " आंधळा कोण ? "

जो विषयानुरागी असून ज्याच्या डोळ्यात 'काम' बसलेले आहे तोच आंधळा धृतराष्ट्र आहे.

दुःखरुपी कौरव धर्मास मारण्यास प्रवृत्त होत असतात. युधिष्ठिर व दुर्योधनाचे युद्ध अद्याप आपल्या शरीरात रोज चालत असते.

दुर्योधन आज सुद्धा येतो.

पहाटे चारच्या सुमारास धर्मराजा मानवास म्हणतो :—

" चल उठ. जागे हो. सत्कर्म कर. साईस्मरण होऊ दे. "

परंतु दुर्योधनरुपी आपले दुसरे मन म्हणते :—

" अरे खुशाल झोप. पहाटेचा गार वारा चालला आहे. किती आल्हादकारक वाटत आहे. स्मरण–चिंतन कशाला ! अजून आराम कर. "

धर्मराज व दुर्योधन मधील हे युद्ध नित्यनेमाने होत असते.

धर्म व अधर्मामध्ये अनादिकालापासून याप्रकारचे युद्ध सुरू आहे.

दुर्योधन म्हणजेच अधर्म.

निद्रा व निंदा यावर विजयी होणाराच भक्ती करू शकतो.

धर्म हा धर्मराजाप्रमाणे ईश्वराकडे नेतो तर अधर्म – दुर्योधन–हा मानवास संसाराकडे वळवितो, व शेवटी त्याचा विनाश करतो.

धर्म ईश्वरास शरणांगत झाला तर धर्माचा विजय होऊन ' ईश्वरप्राप्ति ' होते व अधर्माचा विनाश होतो.

ज्ञानात जीव जेव्हा रममाण होतो तेव्हा ' कौरव ' अडथळे आणतात व मानवास कुमार्गावर अग्रेसर होण्यास प्रवृत्त करतात.

आपले हे शरीरक्षेत्रच ' धर्मक्षेत्रे व कुरुक्षेत्रे ' आहे.

परंतु सध्या कलियुग सुरू आहे. ' कली ' अर्थात ' कलह '. सध्या आपण कलहाच्या युगात वास करीत आहोत.

या कलीयुगात धर्मापेक्षा धनास जास्त महत्त्व प्राप्त झाले आहे.

त्यामुळेच संयम व सदाचार दुरावला आहे. आपणास हे ओळखायला हवे की धनापेक्षा धर्म श्रेष्ठ आहे.

युधिष्ठिररूपी धर्माने उपदेशिल्याप्रमाणेच कर्म करणे आपल्या अर्जुनरूपी शरीराच्या हिताचे आहे.

तेव्हाच सद्गुरू श्री साईबाबा या शरीररूपी रथाचे सारथी-पद स्वीकारतील व या उच्छृंखल इंद्रियरूपी घोड्यावर ताबा मिळवून देतील.

मन म्हणजेच भीष्म.
भीष्म म्हणजे भयंकर.
मन कसे आहे ?
— तर चंचल आहे.

ही चंचलताच भयंकर स्वरूपाची असते.
भीष्मरूपी 'मन' आवेशायुक्त अवस्थेत
'संकल्प–विकल्प' फार करते.
आपले हे मानवी–मनच बाणरूपी
'संकल्प–विकल्पांची' वर्षा करीत असते.

परिणामस्वरूप आपला अर्जुनरूपी 'जीव' जखमी होऊन दुःखावस्थेस प्राप्त होतो.

आपल्यातील सद्वृत्ती
व
असद्वृत्तीचे युद्ध म्हणजेच महाभारत.

# भक्त-बोढाणा

डॉ. के. भ. गव्हाणकर
इंदिरा निवास, आग्रा रोड, कुर्ला, मुंबई ७०

● शांडिल्य आपल्या भक्तिसूत्रात "सा परानुरक्तिः ईश्वरे" भक्ति म्हणजे ईश्वराविषयी परम अनुरक्ति, अशी भक्तीची व्याख्या करतात.

नारद – "सा तु अस्मिन परमप्रेमरूपा । अमृतस्वरूपाच । ...सदा सर्वभावेन निश्चितैः भगवानेव भजनीयः ॥ भक्ति म्हणजे ईश्वराविषयी परम प्रेम. या भक्तीने मनुष्य अमर होतो. सर्वकाळी सर्व भावे निश्चित होऊन केवळ भगवंताची भक्ति केली पाहिजे.

प्रेमाचा संपूर्ण प्रवाह जेव्हा भगवंताकडेच वळवील आणि भगवंतावर जेव्हा तो अनन्य भावे परम प्रेम करील तेव्हाच त्याची भक्ति ही यथार्थ भक्ति आहे असे आपल्याला म्हणता येईल.

चंद्रभागेच्या तिरी असे पंढरीत भक्त पुंडलिकाकरिता पांडुरंग–विठोबा आज विटेवर उभे आहेत, तसेच डाकोरग्रामी द्वारकाधीश- श्रीकृष्ण भक्त बोढाणाच्या प्रेम-भक्तीला भुलून आले व तेथेच डाकोरजी नावाने भक्ताकरिता तिष्ठत उभे आहेत.

सौराष्ट्रात चारशे वर्षांपूर्वी डाकोरग्रामी बोढाणा नावाचा क्षत्रिय गृहस्थ रहात होता. त्याला श्रीकृष्णभक्तिचा छंद लहानपणापासूनच होता. एके दिवशी तो रस्त्याने जात असता त्याला एक स्वामी भेटला. त्याने बोढाणाला सांगितले, 'अरे मुला! या नश्वर जगात श्रीकृष्णभक्तिशिवाय दुसरे काहीही श्रेष्ठ नाही.' बोढाणा म्हणाला, 'पण तो मला साक्षात् भेटेल काय?'

'हो भेटेल, पण श्रद्धा आणि सबुरी ठेवून मी सांगतो त्या मार्गाने जा,' म्हणून श्रीकृष्ण मंत्र त्याला दिला व या मंत्राचा नियमित अंतःकरणपूर्वक निष्ठेने जप कर आणि मृत्तिकेच्या कुंडीत तुळशीचे रोप लाव. त्याची पूजा कर व दर सहा महिन्यानी कुंडीसह ते तुळशीचे रोप द्वारकेस घेऊन जा व त्या तुलसी दलाने श्री द्वारकाधीशाची पूजा कर.

बोढाणा त्याप्रमाणे नित्यनेमाने करीत असे. वर्षातून त्याला दोन वेळा द्वारकेस जाणे पडे. तो आपल्या वयाच्या सात वर्षांपासून श्रीकृष्णाची प्रेमभावाने पूजा–अर्चा करीत असे. पुढे वृद्धावस्था आल्यामुळे शरीर थकले तरीसुद्धा तो आपल्या नियमापासून अणुमात्र ढळला नाही. डाकोर ते द्वारका ५०० मैलाचे अंतर आहे.

आपल्या माया शक्तीने सगुण साकार रूपात ईश्वर प्रकट होऊन भक्ताला विभिन्न रूपात दर्शन देतो. ज्याप्रमाणे विशिष्ट आकार नसलेले पाणी बर्फाच्या रूपात साकार होते, त्याप्रमाणे निराकार परमात्मा भक्ताची दर्शनकामना पूर्ण करण्यासाठी साकार रूप

धारण करतो. उपनिषदामध्ये त्याचे वर्णन 'सत्यं ज्ञानम् अनंतम् ब्रह्म, आनंद रूपम अमृतं यद्विभाति' या शब्दांनी केले आहे. हे सगळे जग त्या सत्स्वरूप परमात्म्याचे रूप असून त्याच्या सत्तेमुळेच ते आपल्याला खरे भासते. परमात्मा एकच असून तोच सर्वांचा स्वामी आहे. तोच सर्व प्राण्यांचा अंतरात्मा आहे आणि आपल्या मायाशक्तीने तोच अनेक रूपे धारण करतो.' परंतु अज्ञानाचे आवरण असल्यामुळे मनुष्याला त्या आत्मप्रभूचे दर्शन होत नाही, अनुभव येत नाही. संत तुलसीदास म्हणतात—

'**तुलसी मूरति राम की घट घट रही समाय। ज्यो मेहंदीके पान में लाली लखी न जाय॥ तुलसी या संसार को भया मोतियाबिंद। है नियरे सूझे नहीं लानत ऐसी जिंद॥**' अर्थात आत्मस्वरूप प्रभु राम सर्वत्र विराजमान आहेत, पण अज्ञानामुळे त्यांचे दर्शन होत नाही. मेंदीच्या पानात लाल रंग ओतप्रोत भरलेला आहे पण तो दिसत नाही. या जगाला जणु काही मोतीबिंदु झाला आहे, म्हणूनच प्रभु इतके जवळ असूनहि दिसत नाहीत. अशा जीवनाचा धिक्कार असो!

निष्ठावंत भक्ताची निस्सीम भक्ति पाहून, द्वारकेचा राणा विचारात पडला, की हा आता म्हातारा झाला, याला द्वारकेस येण्याचा त्रास आता सहन होणार नाही, सहा महिन्यानंतर बोढाणा हळूहळू रस्ता चालू लागला. 'आश्विनी शरदऋतुसी। पातला द्वारकापट्टणासी। देवळात जाऊन तुळसी। श्रीकृष्ण पाहून। साष्टांग नमस्कार घातला। तोच श्रीकृष्ण मूर्ती रणछोडजी बोलू लागली, 'अरे बोढाणा! तुझ्या भक्तीने मी खूष झालो, तू आता म्हातारा झालास, शरीर थकले, तर मीच आता तुझ्या गावी (डाकोर) येतो, चल एक वहान घेऊन ये.'

बोढाणा गरीब असल्यामुळे द्वारकेत पुष्कळ फिरला व शेवटी संध्याकाळच्या सुमारास एकाने एक शकट (खटारा) व म्हाताऱ्या अशक्त बैलांची जोडी दिली. गरिबी असल्यामुळे त्याला बैलाची चांगली जोडी कोण देणार? हळूहळू बैलांना हाकलीत मध्यरात्रीस तो देवळाच्या सन्निध आला. त्यावेळेस पुजारीजनानी हरीची शेजारती करून देवळाला कडी कुलपे लावून ते आपापल्या घरी गेले होते. बोढाणा देवळाच्या दरवाज्याकडे आल्याबरोबर अरगळा (कुलुपे) खाली पडली. आणि दरवाजा उघडला. देव म्हणाले, 'बोढाणा! चल मला आता लवकर घेऊन चल' एवढे म्हणून देव (रणछोडजीची मूर्ती) लहान होऊन त्याच्या हातावर बसली. भक्त बोढाण्यास आनंद झाला आणि त्याने त्या मूर्तीला मोडक्या गाडीत आणून बसवले. त्यावेळी पुनः ती मूर्ती बोलू लागली. 'भक्तोत्तमा गाडी लवकर हाकल, कारण पहाटेस पुजारी काकड आरतीस येतील व त्यांना जर मूर्ती दिसली नाही तर शोध करतील व आपणास धरून नेतील. बोढाणा त्याप्रमाणे गाडी हाकू लागला. परंतु बैल म्हातारे व मरतुकडे असल्यामुळे मध्यरात्रीपासून अरुणोदयापर्यंत कशीबशी गाडी त्याने द्वारकेच्या बाहेर आणली.

प्रातःकाळ आता होईल हे जाणून द्वारकाधीश म्हणाले, 'अरे! तुला नाही ते जमायचे. चल तू आत बस' व स्वतः गाडी हाकू लागले. भक्त बोढाणाचे प्राक्तन थोर

की हा त्या अर्जुनासमान भक्त झाला म्हणून जगजेठी त्याची गाडी हाकू लागले. इतकेच नव्हे तर अर्जुनाहून हा बोढाणा अतिश्रेष्ठ प्रतीचा अधिकारी भक्त ठरला. कारण धरणीभार हरण करण्याकरिता आणि पांडवांकरिता-त्यांच्या संरक्षणाकरिता स्वतः स्मावर अवतरला होता पण ही पाषाण मूर्ती त्या बोढाणाजवळ बोलू लागली व त्याचे सारथ्य केले.

श्री रणछोडनाथाने केवळ 'हुं' कार शब्दात त्या वृषभांना पळावयास लावले व वायुवेगाने डाकोरग्रामी लोक जागे होण्यापूर्वी एका सरोवराकडे आले. त्या मनोहर सरोवरासन्निध एक शिवालय होते (आहे). त्या शिवालयात 'डंकानाथ' अशी आरोळी देऊन आत प्रवेश केला. श्री शंकराने त्याचे स्वागत करून प्रेमाने आलिंगन देऊन आपल्या शेजारी बसविले.

इकडे द्वारकेत नित्याप्रमाणे पंच पंच उषःकाली पुजारी व भक्तजन काकड आरती करण्याकरता आले. तो जागेवर मूर्ती नाही व देऊळ उघडे दिसले. कडी कुलपे नीट लावून बंदोबस्त केला होता, तर मग ही कुलुपे कोणी उघडली आणि मूर्ती कोणी चोरली! आणि ही मूर्ती चोरून नेणारा कोण एवढा समर्थ झाला म्हणून आश्चर्य करू लागले. इतक्यात ही बातमी श्री शंकराचार्यांच्या मठात जगद्गुरूस श्रुत झाली.

श्री भगवान शंकराचार्यांना नवल वाटले. खरोखर कोणी थोर महान श्रीकृष्णाच्या भक्ताचे हे काम असले पाहिजे असे समजून ध्यानस्थ बसले तो त्यांना त्यावेळेस स्पष्ट दिसले की डाकोरग्रामी सरोवरासन्निध असलेल्या शिवालयात डंकानाथ शिवलिंगासमोर रणछोडनाथाची मूर्ती आहे आणि त्यांचेबरोबर बोढाणा भक्तसुद्धा आहे. त्याबरोबर त्या सर्व ग्रामस्थ लोकांना तसे सांगितले व ते सर्व लोक शंकराचार्यांसह डाकोरग्रामी सात दिवसात आले त्यावेळेस हा ऋणमोचन डाकोरनाथ भक्तास म्हणतो, "बोढाणा! माझे शोधास्तव द्वारकावासी श्री शंकराचार्यांसह येत आहेत. म्हणून मी ह्या सरोवराच्या पाण्यात जाऊन बसतो."

द्वारकेचे लोक देवळात पहातात तो फक्त डंकानाथ शिवलिंग दिसले पण रणछोडजीची मूर्ती दिसत नाही; इतक्यात त्यांना भक्त बोढाणा दिसला. त्याला सर्व द्वारकावासी विचारू लागले की, 'बोढाणा, तुझ्याबरोबर द्वारकेतून रणछोडजी आले ते कोठे आहेत?' त्यावर बोढाणा म्हणाला, 'लोकहो! श्रीकृष्ण परमात्मा माझ्याबरोबर इथे आले हे खरे आहे व ह्यावेळपर्यंत श्रीडंकानाथाच्या शेजारी बसले होते. पण आपणास पाहून ते कोठे जाऊन बसले आहेत ते मला माहीत नाही.'

तेव्हा भगवान शंकराचार्यांनी ध्यानस्थ बसून न्याहाळले तो मूर्ती सरोवरात आहे असे दिसले व त्याप्रमाणे त्यांना सांगितले.

पुढे पुजारी आपल्या भाल्याने त्या सरोवरात पाहू लागले. तोच त्यांना आवाज ऐकू आला. भाल्याचा प्रहार श्रीकृष्णमूर्तीला बसला व रक्ताची धार लागली. पाणी

तांबडे झाले. त्यावर तो पुजारी मोठ्याने ओरडला की मूर्ती इथे बसली आहे आणि पहातात तो ती मूर्ती तेथे सापडली.

द्वारकावासी जनांनी ती मूर्ती पाण्याबाहेर आणण्याची शिकस्त केली पण मूर्ती थोडीसुद्धा हालत नाही हे पाहून म्लान वदनाने ते भगवान शंकराचार्यांकडे आले. तेव्हा जगद्गुरू शंकराचार्य म्हणाले, 'तुमच्या हाते हा देव पाण्याबाहेर येणार नाही तरी त्याचा भक्त बोढाणा ह्याला घेऊन या.' सर्व मंडळी बोढाणाजवळ येऊन व हात जोडून प्रार्थनापूर्वक नमस्कार करू लागली. बोढाणा म्हणाला, 'हे भूदेवांनो! मला पामराला कसला नमस्कार करता! आपण सर्व वर्णांचे गुरु आहात. मला पाप्याला नमस्कार कसा करता! आपण विप्र मला माझे 'गुरुस्थानी' असून माझे इष्ट दैवत तुम्हीच आहात. तुमच्या सेवेमुळे देवांनी माझ्यावर कृपा केली; तुम्ही ब्राह्मण परमप्रिय देवासी, ब्राह्मणाच्या अनुग्रहाशिवाय कदापि ईश्वर पावत नाही. ब्राह्मणात ब्रह्मवेत्ते किती झाले व किती पुढे होतील. ब्राह्मण हे देवाचे मुख व अग्नीचे उपासक आहात. आपण मंत्राने अग्नी प्रज्वलित करता, अर्थात विराट स्वरूपाचे मुख भूदेव आहात ह्यात काही गैर शंका नाही. मी आज्ञाधारक, पूज्य तुम्ही मजलागी माझा सद्गुरु आहे. ब्राह्मण त्याची मला आज्ञा आहे की विप्रांची सेवा कर व त्यांचे वचन कधीहि मोडू नकोस. तरी मला जे काय सांगाल ते मी त्वरित करतो.'

भक्त बोढाणाचे नम्र भाषण ऐकून ते म्हणाले, 'भक्तराज आमच्याबरोबर येऊन सरोवरात बसलेली श्रीकृष्णमूर्ती बाहेर आणा.'

बोढाणा सरोवराच्या काठी आला आणि म्हणाला, 'भगवंता चला आपण' हे वाक्य ऐकताच भगवंताची मूर्ती तात्काळ उदकाबाहेर आली आणि देवालयात श्रीरंकानाथाच्या शेजारी तिला बसविले.

देवालयात आल्यावर वनमाळी बोढाणाला म्हणाले, 'बोढाणा त्या सर्व द्वारकावासी जनास सांग की मी तुमच्याबरोबर येत नाही. आजपासून माझा निवास डाकोरास च राहील व जशी द्वारका तसेच डाकोर ग्राम राहील. द्वारकेत गोमती तीर्थ तर इथे सरोवर-गोमतीर्थ जाणावे. आता तुम्ही तुमच्या मनात असलेली दुसरी कोणतीही इच्छित वस्तू मागून घ्या.' त्याप्रमाणे बोढाणाने त्या द्वारकावासी लोकांस सांगितले.

पुजाऱ्यांनी विचार केला की बोढाणा गरीब आहे तरी आपण त्याच्याजवळ मूर्तीभार सोने मागावे. मूर्ती जड आहे, जवळ जवळ एक मण भरेल व त्याला ते शक्य नाही आणि मग देवास द्वारकेस येणे भाग पडेल असा विचार करून त्यांनी बोढाण्यास सांगितले की 'देवाची मूर्ती तू सोन्यानी कर' आणि मूर्तीभार सोने आम्हास द्यावे नाही तर द्वारकानाथास आमच्या सवे पाठवावे.

बोढाणा घाबरून गेला आणि देवाला प्रार्थना करू लागला. ' देवा माझ्याजवळ एक मात्राभरही सुवर्ण नाही. आता मी काय करू ?' आपल्या भक्ताचा अभिमान बाळगणारा श्रीकृष्ण परमात्मा म्हणाला, ' वेड्या घाबरू नकोस मी सांगतो असे कर. तुझ्या पत्नीच्या नाकात १। वालाची नथ आहे ती तू तुलेत एका पारड्यात घाल व दुसऱ्या पारड्यात मला ठेव.'

त्याप्रमाणे भक्ताने आपल्या बायकोची नथ आणली. एका पारड्यात १। वाल वजनाची नथ व दुसऱ्या पारड्यात १ मण वजनाची श्रीकृष्णमूर्ती ठेवली तो काय आश्चर्य झाले की अवघे १। वाल सुवर्ण असता ते पारडे खाली राहिले आणि मूर्ती वर गेली. हे पाहिल्यावर सर्वांना मोठाच धक्का बसला आणि सर्व रडू लागले. त्यांचे दुःख पाहून भक्त बोढाणा कळवळला व कळवळ्याने भगवंताची प्रार्थना केली. ' हे जगज्जीवना, भक्तवत्सला ऋणमोचना, देवाधिदेवा गोविंदा जसा मी तुझा दास तसेच द्वारकावासी द्विज तुझे दास आहेत, तरी त्यांच्यावर कृपा कर आणि कृपाकटाक्षे त्यांची मनोवृत्ति शांत कर.'

बोढाणाची ऐसी प्रार्थना ऐकून द्वारकेचा राणा म्हणाला, 'भक्तराया ह्या विप्रांना असे सांग की माझी मूर्ती समुद्रात आहे ती आणून माझ्या जागेवर बसवा म्हणजे द्वारकेचे महात्म्य तसेच राहून डाकोरचेहि स्थान तसेच राहील. इतकेच नाही तर डाकोर-द्वारकेत भिन्नत्व यत्किंचितही रहाणार नाही. दोन्ही स्थाने क्षेत्रे रहातील आणि तुमचे सर्व मनोरथ त्या माझ्या मूर्तीच्या पूजनाने सिद्ध होतील हे निश्चित जाणा.'

त्याप्रमाणे परमात्मा बोलला त्याप्रमाणेच बोढाणाने त्या सर्व लोकांस सांगितले. नंतर द्वारकावासी जनाने श्रीकृष्णाचे प्रार्थनापूर्वक वंदन केले व द्वारकेत आले.

नंतर शंकराचार्यांनी सर्व जनास जमवून समुद्र किनारी नेले व मूर्ती होती ते ठिकाण दाखविले. नंतर ती मूर्ती वाजत गाजत भजनाच्या गजरात आणून मूळ स्थानी स्थापना केली. भगवान शंकराचार्यांनी स्वतः त्या मूर्तीची मंत्रोपचाराने व यथाविधीपूर्वक प्राणप्रतिष्ठा केली.

डाकोरनाथाचे नाम ऋणमोचनदेव आहे. या कारणावरून सर्वजण रणछोडजी म्हणतात. त्याचे दर्शन घेतले नाहीतर द्वारका यात्रेचे फळ मिळत नाही म्हणून.

वेदे केले कथन । की देवाच्या मूर्तीने जाण । सर्वथा नाही जाड्यपण । परी मूर्खाचे ह्रदय । जड पाषाणसम आहे ॥ यास्तव मूर्खालागी पाहे । मूर्ती माजी देव नोहे । भासतसे या कारणी.

ती मूर्ती शरत्पौर्णिमेस द्वारकेतून आली आणि कार्तिक पौर्णिमेस प्राणप्रतिष्ठा झाली म्हणून आश्विन व कार्तिक पौर्णिमेची मुख्य यात्रा पर्वणी तिथे असते.

ॐ

# प्रवास

श्री. गं. रा. भट,
संदेश हौसिंग सोसायटी, गोरेगाव (पूर्व)

● श्री सद्गुरु साईबाबा, तुमच्या कृपेने आजचा दिवस उजाडला. असे 'आजचे दिवस' आयुष्यात किती उजाडले आणि मावळले. काल, आज आणि उद्या हे कालचक्राचे फेरे फिरतच आहेत. केव्हातरी शेवटचा 'आज' उजाडेल आणि इतिश्री होईल.

बरं, एवढ्या कालावधीत केलं काय ? काही सत्कर्म ? काही निष्काम सेवा ? कुणाचे दुःख विमोचन ? कुणाला मदतीचा हात ? कुणाचे सांत्वन ? कुणाला हसवलं ? कुणाचं रंजन केलं ? श्रीसाईबाबांनी सांगितलेला कोणता उपदेश आचरणात आणला ? काय सांगू राव ? सगळी पाने कोरी करकरीत आहेत. असू देत, कोरी असूं देत. काळीकुट्ट असण्यापेक्षा कोरी परवडली. नाही राव, तिथेही तुम्ही चुकता. मन हे जोपर्यंत या षड्रिपूंच्या स्वाधीन आहे तोपर्यंत काहीना काही काळे ठिपके आहेतच. ते आता कसे पुसून टाकता येतील ?

तुम्ही आलात कुठून ? कशासाठी ? जाणार कुठे ? काय सांगू ! सर्वच अज्ञात आहे. आईवडिलांनी जन्म दिला त्या दिवसापासून प्रवास चालूच आहे. कोणतेही कर्म घडलं तरी त्याला कर्ता लागतो, कारण लागते. माणूस प्रवास करतो. प्रवास करण्याचे प्रत्येकाचे हेतू निरनिराळे असतात. पण या आयुष्याच्या प्रवासाला सुरूवात झाली तीच मुळी कारण माहीत नसताना. म्हणून हा एक हेतू शून्य अंधारात चाललेला प्रवास आहे.

किती ठेचा लागल्या, किती खरचटलं. कितीदा रट्टे खाल्ले. तरीपण प्रवास चालूच आहे. प्रवासात काही पुण्यात्मे भेटतात. दीपस्तंभाप्रमाणे धोक्याची सूचना देणारे. प्रवासात मदत करणारे. दुसऱ्याचा प्रवास सुखी व्हावा म्हणून झटणारे, धडपडणारे काही फसवे पण असतात. चुकीच्या मार्गाने त्यांच्याबरोबर गेले की खड्डयात पडणारच. हे सर्व मोहाचे बळी असतात. काही दुःखी भेटतात. काही हसणारे आणि हसवणारे भेटतात. काही उपद्व्यापी पण असतात. भांडण लावून देऊन गंमत पहाणारे. काही उपकार करून शेवटी गळा कापणारे. काही कृतघ्न असतात, तर काही कृतज्ञ पण असतात. थोडक्यात नाना मतींचे, नाना प्रकृतींचे हे प्रवासी आहेत.

काहींचा प्रवास संपलेला असतो. पण त्यांनी ज्या मार्गांनी प्रवास केला तिथे काही स्पष्ट खुणा दिसतात. तिथे थोडा प्रकाशपण दिसतो. अशा तऱ्हेचे निरनिराळे मार्ग अजून

मधून दिसतात. मनात विचार येतो आपण त्या मार्गाने जावे का ? काय होईल ? माझ्या बरोबर अंधारात प्रवास करणारे माझे इतर सहप्रवासी काय म्हणतील ? त्यांना काय वाटेल ? मनाचा निश्चय होत नाही. मायेच्या जाळ्यात आम्ही एकमेकांच्या पायात पाय घालून अडकून पडलो आहोत. आपल्यापैकी सुद्धा त्यातून कुणी बाहेर जावे असे कुणालाच वाटत नाही. प्रवास तसाच चालू रहातो. मी नापास झालो या दुःखापेक्षा माझ्याबरोबर दुसरे पुष्कळ नापास झालेले आहेत हा आनंद फार मोठा.

असा हा स्वसुखाच्या धडपडीसाठी चालू असलेला दुःखदायक प्रवास अगदी संपण्याचा क्षण आला होता. पण पूर्वपुण्याई का पूर्वसुकृत असं काही म्हणतात ना त्या प्रमाणे ज्याचे नाव गाव माहीत नव्हते असा एक अवलिया त्याच्या चरित्ररूपाने मदतीला धावून आला आणि या अभाग्याचा पुनर्जन्म झाला. प्रवासाची दिशा बदलली. पाय शिर्डीला लागले. खूपखूप रडलो. श्रद्धा आणि सबुरी हा दिव्य संदेश मिळाला. सव्वीस वर्षांचा काळ लोटला.

माणसाला स्वाभिमानाने जगण्यासाठी जे काही असावे लागते ते सर्व काही बाबांनी मला न मागता दिले आहे. लौकिकदृष्ट्या लोक मला भाग्यवान म्हणतात. त्यांना असे वाटते की आज जे काही आहे ते माझ्याच कर्तृत्वाचे फळ आहे. माझ्या कर्तृत्वाचा वाटा आहे. पण सव्वीस वर्षांपूर्वी काय घडणार होते ते कुणाला ठाऊक आहे ? आज जे काही आहे ते बाबांनी दिले आहे. ते सर्व त्यांचे आहे. माझे काहीही नाही. आता आणखी कशाची अभिलाषापण राहिलेली नाही. इतके सर्व असूनही मन शांत नाही. का ? मन कशात गुंतून पडले आहे ?

दुःख एकच आहे. श्रीसद्गुरु साईबाबांचे हे ऋण मी भक्तीभावाने सुद्धा फेडू शकत नाही. भक्तीची चंद्रभागा दुथडी वाहत नाही. तिला भक्तीचा पूर येत नाही. अंतःकरणात तळमळीच्या भक्तीची ज्योत पेटत नाही. माझी जीवनज्योत विझण्यापूर्वी अंतःकरणात तळमळीच्या भक्तीची ज्योत प्रदीप्त होवो एवढेच श्री साईबाबांच्या चरणी मागणे आहे. त्या गुरुमाऊलीची जर एवढी कृपा झाली तर जन्माचे सार्थक होईल. अज्ञात कारणाने सुरू झालेला हा प्रवास त्यांच्याच चरणी संपेल. बाबा, तुम्ही न बोलावता माझ्या मदतीला धावून आलात हे केवढे माझे भाग्य ! लेकरू विसरलं तरी माय विसरत नाही. बाबा, लेकराला एवढी भीक घाला. लेकराचा हा हट्ट तुमच्याशिवाय, माऊलीशिवाय कोण पुरवील ? ‘ म्हणोनि म्हणती भले न ऋण जन्मदेचे फिटे. ’ (केकावली—मोरोपंत) बाबा, तुमचे ऋण जन्मजन्मांतरी फिटणार नाही. लेकराला संभाळून घ्या. तुम्हाला माझे शतशः प्रणाम.

❋

# स्वप्नी श्रीसाई दर्शन

श्री. सुभाष अंकुश सावंत
५/३० मुकेश मिल कंपौंड, कुलाबा, मुं. ५

● एक दीड वर्षापासून मी 'साईलीला' मासिकाचा नियमित वाचक आहे. पण काय चमत्कार म्हणा ! मासिक वाचण्यापासूनच साईबाबांविषयी इतके प्रेम निर्माण झाले ते या ठिकाणी लिहिणे अशक्य आहे. 'शिरडीस जाऊन साईबाबांचे दर्शन घ्यावे असे वाटू लागले. पण शिरडीस जाण्याचा योग आजपर्यंत काही आलाच नाही, आणि साईंच्या दर्शनाविषयी लागलेली आस आणि तळमळ पुरी झाली नाहीच.

काही महिन्यापूर्वीच माझी नोकरी काही कारणामुळे गेली. तेव्हा या बहुरंगी बहुढंगी मुंबापुरीत नोकरीविना रहाणे अगदी मुश्कील झाले. पण इलाज नव्हता. नोकरी लागत नाही म्हणून निराश होऊन गावी जाणे मनास पटत नव्हते. म्हणून दृढ निश्चय करूनच मी मुंबईत राहू लागलो, आणि साईविषयी मिळेल ते वाचण्याचा चंग बांधला. पण तरीसुद्धा मनाची धुगधुग थांबत नव्हती. नोकरीची काळजी होतीच.

अशाच स्थितीत एका रात्री पहाटे चारच्या सुमारास मला एक स्वर्गीय स्वप्न पडले. त्याचा मला आजही प्रत्यय येत आहे.

" अचानक कुठून तरी मंद मंद वाऱ्याची झुळूक येत होती. सर्व कसं शांत निरव वाटत होतं. अशाच त्या मधुर समयी मी कोठेतरी एकटा, अगदी एकटाच निघालो होतो. मला स्वतःला कुठे जायचे याचे भानही नव्हते. चालणंच माझ्या नशिबी होतं. कुठून तरी घंटेचा घंटानाद ऐकू येत होता. कुणास तरी काही कामानिमित्त लवकर जाण्याची घाई असावी आणि तो लवकर पूजा-अर्चा करीत असावा हे स्पष्टच होत होते. मी मानेला एक झटका दिला. परंतु काही नाही. सारखा चालतच होतो. कुठल्यातरी निर्मात्याने निर्माण केलेल्या राज्यात जात होतो. हेही माहीत नव्हते. ते जग खरोखरच नवीन होते. माझ्याप्रमाणे कित्येकजण चालत होते. त्यांनाही बापड्यांना कोठे जायचे हे ठाऊक नसावे. जे येत होते त्यांच्या चेहऱ्यावर समाधान ओसंडून जात होते. कोणत्याही दुःखाचा वा चिंतेचा लवलेशही त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता. त्यांच्या एकंदर सर्व चेहऱ्यावरून चैतन्यच ओसंडून जात होते. मात्र माझी छाती धडधडत होती. मागेही फिरणे मला जमण्यासारखे नव्हते. विधात्याने ह्यापुढे माझ्या नशिबी काय वाढून ठेवले हे तोच जाणे ! चालता चालता मी एका विस्तीर्णमय बगीच्यात जाऊन पोहोचलो. मला वाटते तो परीसर त्या जगातील एक नंदनवन म्हणून प्रसिद्ध असावा. त्याच्यापुढे एका जागी माणसानी भरून गेलेला मंडप होता. अनेक

चेहऱ्याची माणसे त्या मंडपात शांत चित्ताने बसली होती. जणू काय पृथ्वीवरील माण-सापाशी असलेल्या दुष्ट चक्राचा मागमुसही त्यांना नव्हता. त्या जगातील प्रत्येकाला कशाचीही खंत अथवा फिकीरही नव्हती. असे त्यांचे चेहरे मला दिसत होते. त्यांच्या सर्वांच्या मधोमध ' श्री साईबाबा ' बसले होते. धीर गंभीर तरी सुद्धा चेहरा प्रकाशमय होऊन तेजाळत होता.

मी त्या ठिकाणी जाऊन पोहोचलो. काय करावे या विचारात मी तेथे थोडा वेळ तटस्थ उभा होतो. तेवढ्यात नकळत पुढील शब्द माझ्या कानावर आदळले. ' ये! बेटा मी तुझीच तर वाट पहात आहे ! ' ते शब्द साईबाबांच्याच मुखातूनच बाहेर पडले होते. मी नकळतच त्यांना नमस्कार केला. त्यांच्या डोळ्यात असे काही तेज होतं की प्रत्येक क्षणाक्षणाला नवीन नवीन दर्शन त्यांच्या डोळ्यातून होत होते. बोलण्याचा प्रश्नच नव्हता. त्यांच्या दृष्टीत सारे काही भरले होते. फक्त पहाणाऱ्याचेच मन निर्मळ हवं होतं. माझी कथा मला कथन करावी लागलीच नाही. त्यांच्या त्या पहाण्यातूनच त्यांच्या दोन नेत्रात सारे काही उमजून येत होते. प्रत्यक्ष साक्षात्काराचे दर्शन ते दोन दिव्य मणी न बोलताही साक्षात्कार घडवीत होते. हळू हळू मी या पृथ्वीवर येऊ लागलो. आणि बिछान्यावर धाडकन आदळलो. जागा झालो. स्वप्न संपलं होतं. डोळे चोळले. जे घडले, जे दिसले त्यावर माझा विश्वास बसत नव्हता. पण ते दोन नेत्र माझ्या डोळ्यासमोर सारखे येऊ लागले. उठून बसलो आणि साईंच्या मूर्तिपुढे हात जोडले. जे मला साईंचे नेत्रांचे झालेले अलौकिक दर्शन म्हणजे माझ्या जीवनातील एक सोन्याहूनही आगळा वेगळा ठेवा मी समजतो.

त्यानंतर मला दोन दिवसांनी चांगल्या प्रकारची नोकरी लागली आणि आज ते दोन नेत्र माझ्यासमोर आले की वरील सर्व प्रसंग डोळ्यासमोर उभा रहातो. पण अजून मला शिरडीस जाण्यास जमले नाही. याची रुखरुख मला सारखी लागून राहिली आहे ! कोण जाणे ते दोन डोळे मला सूचना तर देत नाहीत ना !

# फोटो ! फोटो ! बाबांचा फोटो

— अनिल पंडित
इन्दूर (म. प्र.)

मी श्रीसाईबाबांचा एक जुना भक्त आहे. नाही नाही म्हणता मला बाबांची ओळख होऊन पंधरा सोळा वर्षे झाली आहेत. ह्या काळात मला बाबांचे बरेच छोटे मोठे अनुभव आले आहेत. बाबांच्या आशीर्वादाने माझ्या जीवनाच्या आर्थिक परि-स्थितीचा आलेख वरवरच चढत आहे. तो कधीपण स्थिर रहात नाही किंवा खालीपण

गेला नाही. ही बाबांची माझ्यावर फारच मोठी कृपा आहे. ह्या कृपेच्या ऋणाची परत फेड ह्या जन्मात तरी शक्य नाही. मी बाबांची नित्यनियमाने पूजा व आरती करीत असतो. त्यात शक्य पावेतो खंड पडू देत नाही. माझ्या रोजच्या जीवनात मला बाबांची प्रचिती पहावयास मिळते व बाबांच्या लीलेचे कौतुक केल्यावाचून राहवत नाही. अशीच एक घटना ह्या महिन्याच्या १७ ता. ला घडली.

माझा एकुलता एक मुलगा निरज एकाएकी आजारी पडला व इन्दूरच्या एका हुशार बालरोग विशेषज्ञाने(CHILD SPECIALIST) त्याला इन्दूरच्या मोठ्या दवाखान्यात लगेच भरती करण्यास सांगितले. त्याला FOLLICULAR TONSILITIES म्हणून निदान करण्यात आले. ज्या मुलांना लहानपणी ट्रिपल (TRIPLE) लागत नाही त्या लहान मुलांना ह्यापासून धटसर्प होतो. तेव्हा अशा परिस्थितीत डॉक्टर हयगय करीत नाहीत व लगेच दवाखान्यात भरती करण्यास सांगतात त्याप्रमाणे आम्ही त्याला लगेच मोठ्या दवाखान्यात भरती केले व इलाज सुरू केला. निरजच्या सोबत त्याची आई व मी झोपण्याकरिता जात होतो. रात्रीचा वेळ जावा म्हणून (SALESMANSHIP) नावाचे पुस्तक मी घरून दवाखान्यात वाचण्याकरिता एके दिवशी नेले व त्यात खूण राहावी म्हणून मी त्यात माझे (नाव-पत्त्याचे) पत्र ठेवले. रात्री दवाखान्याच्या पलंगावर पुस्तक वाचण्यास घेतले व पुस्तक उघडल्यावर त्यातून बाबांच्या आशीर्वादाचे दोन छोटे फोटो पडले. एक रंगीत व दुसरा पांढरा होता. मला व माझ्या बायकोला आश्चर्याचा धक्काच बसला व आम्ही आमच्या छोट्या निरजला म्हटले की, पहा निरज, बाबा तुला दवाखान्यात भेटावयास आले आहेत व आता तू अगदी लवकर बरा होशील, आणि त्याच्या तब्येतीत फरक पडून तो अगदी पूर्ण बरा झाला. त्याला दवाखान्यातून मुक्तता दिली तो दिवस साईभक्तांनो गुरूवारचा होता.

ह्या ठिकाणी दोन गोष्टी मनात येतात, पहिली ही की मला नेमके तेच पुस्तक वाखान्यात नेण्याची इच्छा होणे, व दुसरी त्या पुस्तकात मी बाबांच्या आशीर्वादाचे दोन फोटो ठेवले आहेत, ह्या गोष्टीचा पूर्ण विसर पडला. पण हीच तर बाबांची लीला आहे.

ॐ

श्रीसाईबाबा व श्रीराममारुती महाराज
मनोरंजक लेख येत्या अंकी वाचा.

# ... मला साई भेटले! ...

वसंत महादेव फरतोडे
खार, मुं. ५२

श्री साईबाबा हे नाव जवळ जवळ सर्वांनाच माहीत आहे. पण एका काळी मला साई हे नाव माहीत नव्हते.

एक दिवस अमरावतीचे माझे परम मित्र श्री. शंकरराव साहु हे मुंबईला आले, व मला म्हणाले की आपण शिर्डीला जाऊ. मला याबद्दल फारच आश्चर्य वाटले की आपण शिर्डीला कसे जावे. पण सर्व खर्च करून मित्राने मला शिर्डीस नेले. माझे मित्र श्री. शंकरराव साहु हे श्रीसाईबाबांचे परम भक्त आहेत. ते नेहमी शिर्डीला जात असतात.

ठरल्याप्रमाणे आम्ही दोघे श्री साईबाबांचे दर्शनास शिर्डीस पोचलो. स्नान वगैरे सर्व विधी आटोपून मंदिरात गेलो. मी स्वतः हार प्रसाद काहीच विकत घेतला नाही. मित्रांनीच सर्व खर्च केला. येताना एक लहान सुंदर मूर्ती विकत घेऊन दिली व मला सांगितले की तू रोज पूजा करीत जा.

घरी आल्यानंतर मी रोज नियमित पूजा करू लागलो. पण मला वेळ नसल्यामुळे पूजा योग्य रीतीने होत नव्हती. पुढे काही दिवसांनी परत मी व माझी पत्नी आम्ही दोघे शिर्डीला गेलो. तेथून वटपौर्णिमेला १॥ फूट उंचीची बाबांची मूर्ती आणली. पुढे रोज नियमित पूजा करू लागलो. तसेच घरचे सर्व लोकसुद्धा पूजा करू लागले व रोज संध्याकाळी आरती वगैरे पण होत असते.

पुढे मला लहान धंद्यात चांगलाच फायदा होऊ लागला. मी बाबांना कुठलीही गोष्ट मनातून प्रगट केली की ती बाबा पूर्ण करू लागलेच. भरपूर पैसा मिळू लागला. पुढे शिर्डीस गेल्यापासून माझी प्रत्येक इच्छा पूर्ण होऊ लागली.

पण तो एक दिवस म्हणजे माझ्या आयुष्यातला सोनेरी अक्षरांनी लिहून ठेवण्या सारखा दिवस होय. तो दिवस म्हणजे गुरुवार होय. श्री साईबाबांनी मला कशा स्वरूपात 'दर्शन दिले त्याबद्दल मी लिहितो.

त्या दिवशी ( गुरुवारी ) सकाळी मी पूजा वगैरे आटोपून बाहेर एका मित्रासोबत धंद्याविषयी बोलत होतो. समोरच एक खाजगी दवाखाना होता.

सकाळी ११॥ ते १२ वाजण्याची वेळ होती. तेवढ्यात अंगात लांब पांढरा झब्बा व डोक्यास कफनी बांधलेला एक तरुण पुरुष माझ्या समोर येऊन मला म्हणाला की मला १) रुपयांचे हिरवे कापड झेंड्याकरिता पाहिजे. तेवढ्यात माझा मित्र म्हणाला की असे तुमच्यासारखे साधू रोज येतात. तुम्ही पुढे जा. तो पुरुष जाण्यास तयार

नव्हता. शेवटी मी त्या पुरुषाला जवळच असलेल्या कापडाच्या दुकानात घेऊन गेलो. तेथे त्याला सांगितले की, तुम्ही कापड घ्या. पण त्या दुकानात सव्वा रुपयाचे कापड नव्हते. त्यावर मी म्हणालो की तुम्ही कोणत्याही प्रकारचे कापड घ्या. मी पैसे देईन. पण तो पुरुष म्हणाला की, मला जास्त महाग कापड नको. फक्त १। रुपयाचेच कापड पाहिजे. शेवटी मी त्याला म्हणालो की तुम्ही १। रुपया घ्या व दुसऱ्या दुकानातून कापड घ्या. ते सुद्धा ऐकण्यास तो तयार नव्हता. मी फारच समजावून सांगितले. शेवटी तो म्हणाला की बरे तर दया १। रुपया त्याप्रमाणे मी त्याचे हातावर १। रुपया ठेवला. नंतर तो मला म्हणाला, की "तू मला १। रुपया दिलास, पण तू मजकडे काहीतरी माग." मी त्यावर म्हणालो की, मला साईबाबांनी भरपूर दिले आहे. मला कांहीच नको. फक्त तुमचा आशीर्वाद पाहिजे. मग त्यांनी आपल्या झोळीतून एक लहान कागद माझ्या हातावर ठेवला व तो पुरुष नाहीसा झाला. मी त्यांना शोधण्याचा फार प्रयत्न केला. पण नंतर तो पुरुष दिसलाच नाही. म्हणजे अशा प्रकारे मला बाबांनी दर्शन दिले.

असे सर्वांनाच श्री बाबांनी दर्शन देऊन त्यांच्या इच्छा पूर्ण कराव्यात अशी श्री साईचरणी प्रार्थना आहे. अशा प्रकारे मला फार बाबांचे अनुभव आहेत व आशिर्वादही आहेत.

आज सर्वात जागृत दैवत श्री साईबाबा आहेत. बाबांचे मंदीरात सर्वच जातीय धर्मांचे लोक येतात. कुणालाच भेदभाव वाटत नाही. ज्या भावनेने लोक बाबांना पाहतात व श्रद्धेने पूजा (भक्ती) करतात त्याच भावनेने श्री साईबाबा लोकांना दर्शन देऊन त्यांची इच्छा पूर्ण करतात.

श्री साईबाबांनी भक्तांना पूर्वीच सांगितले होते की–

–जो जो मज जैसा जैसा भावे ॥ तैसा तैसा पावे मीही त्यांसी ॥

आजपर्यंत बाबांचे चरणाजवळ आलेल्या दुःखी भक्तांना बाबांनी आश्रय दिला आहे.

श्री सद्गुरु साईबाबांच्या लीला अगाध आहेत. साक्षात श्री (दत्ताचा) अवतार श्री साईबाबा आहेत. प्रत्येक भक्ताने बाबांच्या दोन महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात त्या म्हणजे श्रद्धा आणि सबुरी.

श्री सद्गुरु साईबाबांनी प्रत्येक भक्तावर कृपा करावी अशी श्री साईचरणी प्रार्थना आहे.

# : श्रीसंत गुलाबबाबांच्या लीला :

● राम गोविंद सुरकुटे,
प्लॉट नं. ४३, गणेशनगर, नागपूर

या भारतात संतांची परंपरा फार पुरातन काळापासून चालत आली आहे. मानवाला चांगल्या सन्मार्गाला लावायचे कार्य ज्ञानी, योगी, संतपुरुषच करू शकतात. मानवाच्या खऱ्या शंकांचे चिंतेचे निराकरण संताशिवाय कोणीही करू शकत नाही हे जेव्हा कळून येते तेव्हा संताभोवती भक्त गोळा होऊ लागतात.

श्री संत गुलाबबाबा भक्तांना आपल्या वाणीद्वारे खऱ्या सेवेची ओळख करून देतात. भक्तीमार्गाची ओळख करून देतात. दुर्जनांना वाईट कृतीपासून परावृत्त करून भक्तीचा महिमा वर्णन करतात. जो कोणी एकदा गुलाबबाबांच्या सहवासात येतो, तो पुन्हा कधी बाबांना विसरू शकत नाही.

समस्त मानवजातीचे कल्याण करण्याचे कृत्य श्री संत गुलाबबाबांनी अंगीकारले आहे. त्यांच्या कीर्तनात अनेक गोष्टींचा उलगडा होत असतो. उदाहरणासहित संवाद ऐकावयास मिळतो. श्रीसंत गुलाबबाबा चमत्कारापेक्षा सेवेला, भक्तीला अधिक किंमत देतात. भक्तांना दर्शन देण्याकरिता सदोदितच हजर असतात. त्यांना थकवा मुळीच येत नाही. प्रफुल्ल मन, आनंदित चेहरा बघून भक्तांना आशिर्वाद व दर्शन घेतल्याशिवाय परत जायचे कधीही मनात येत नाही. चमत्कारातूनही भक्तांना दर्शन लाभत असते. भक्तांचे अंतरंग दुरून राहूनही गुलाबबाबा ओळखीत असतात. श्री संत गुलाबबाबांनी आपल्या भक्तांना चमत्कारातूनही दर्शनाचा लाभ दिला आहे. तेव्हा भक्ताच्या वाणीतून ऐकलेल्या काही लीला, अनुभव इतरांना माहीत व्हावेत म्हणून या लेखात देत आहे –

### १. शेगावला घडलेला चमत्कार :-

श्री संत गुलाबबाबांचे भक्त एकदा शेगाववरून गाडीने जावयास निघाले. पण गाडी निघून गेली. श्री संत गुलाबबाबांनी हे बघितले. भक्त शेगावलाच राहणार होते. तेव्हा भक्तांची गुलाबबाबांना दया आली. त्यांनी भक्तांना हात देण्यास सांगितले. तेव्हा कोण्या एका भक्ताने हात दिला व आश्चर्य! दूरवर गेलेली चालती गाडी थांबली. भक्त गाडीत बसले व गाडी चालू झाली. ह्या प्रकाराची त्या भागात भक्तामध्ये फार चर्चा झाली.

—गंगासागरच्या यात्रेला जाताना सुद्धा चालती गाडी थांबविण्यांत आली होती.